देशोन्नती अ कदीर आलेगांव

# नूतन विद्यालयमध्ये डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची पुण्यतिथी व सायबर मार्गदर्शन

## खंडेलवाल महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींचे सायबर क्राइमबाबत मार्गदर्शन

**देशोन्नती वृत्तसंकलन »**



**आलेगाव :** येथील नूतन विद्यालय येथे दिनांक २८ जुलै रोजी डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांचा पुण्यतिथी कार्यक्रम आयोजित करण्यात आला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवर व शिक्षकांच्या हस्ते पुष्प अर्पण करण्यात आले.कार्यक्रमामध्ये प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार नयरखान,श्रीधर लाड तसेच विद्यालयाचे प्राचार्य वसंत राठोड,पर्यवेक्षक माळी तसेच सायबर मार्गदर्शक म्हणून अकोला खंडेलवाल महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी कुमारी साक्षी फाटकर व हर्षा बिहाडे आदी मंचकावर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रस्ताविक मध्ये शिक्षक सरप यांनी विद्यार्थ्यांना डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांच्या जीवनाचे फार सुंदर प्रसंग समजावून सांगून शिक्षणासह सर्वांगीण विकास आणि अष्टपैलू व्यक्तिमत्व किती महत्वाचे आहे हे स्पष्ट करून सांगितले.

तद्नंतर सायबर मार्गदर्शन अंतर्गत साक्षी फाटकर व हर्षा बिहाडे यांनी विद्यार्थ्यांना मोबाईल वापरत असताना तसेच त्यांचे पालक मोबाईल वापरत असताना ते या सायबर गुन्ह्यांमध्ये अडकू नये याकरता विविध सायबर गुन्ह्यांबद्दल तसेच जागरूकता निर्माण करण्या संदर्भात माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे संचालन नूतन विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी केले. या कार्यक्रमाकरिता नूतन विद्यालय आलेगाव तसेच गुरु गणेश मिश्री जैन कनिष्ठ व सीनियर कॉलेजचे सर्व विद्यार्थी व शिक्षक या उपस्थित होते.